**पाठ ४. तृणाची थोरवी**

**ठळक मुद्दे**

**तृणाची थोरवी**

या पाठातून तुम्ही पुढील विचार समजून घेऊ शकाल-

१.साने गुरुजी यांचे मराठी साहित्यातील स्थान

२. गवताचे महत्व

३. 'तृणाची थोरवी' यातील रुपकात्मता

४. साने गुरुजी यांची विचारसरणी

५. या लेखाचे वाङ्मयीन महत्व

**प्रस्तावना**

लेखक साने गुरुजी यांचा परिचय (येथे क्लिक केल्यास जोडणी लिंकमध्ये पुढील माहिती उपलब्ध्द होईल-)

http://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%AA%E0%A4%BE%E0%A4%82%E0%A4%A1%E0%A5%81%E0%A4%B0%E0%A4%82%E0%A4%97_%E0%A4%B8%E0%A4%A6%E0%A4%BE%E0%A4%B6%E0%A4%BF%E0%A4%B5_%E0%A4%B8%E0%A4%BE%E0%A4%A8%E0%A5%87

**पाठाचा आशय –**

निसर्गातील एखाद्या छोट्या घटकामुळेही लेखकांच्या मनावर विचार तरंग उमटतात. त्यातून जीवनाचे एखादे तत्त्वज्ञान आपल्या समोर कसे सहज उलगडते याचे हा लेख म्हणजे उत्तम उदाहरण आहे. या पाठाचे महत्वाचे सूत्र आहे ते म्हणजे 'तृण लहानसे परंतु महिमा थोर असे'.

पाठ वाचा आणि पाठ वाचताना एकेका परिच्छेदात साने गुरुजी यांनी गवताच्या संदर्भात कोणता मुद्दा मांडला आहे ते पहा.

**तृणपर्ण प्रतीकाचे महत्त्व**

लेखकांच्या विचाराला चालना मिळते ती गवत आणि त्या संदर्भात एका कवीच्या 'तृणपर्ण' या काव्यसंग्रहामुळे. प्रथम लेखकांना प्रश्न पडतात आणि त्याची उकल करण्यासाठी विचार करणे सुरु होते.

गवतामध्ये केव्हढे सामर्थ्य आहे याचा प्रत्यय लेखकांना येतो. एवढेसे गवत पण सा-या सृष्टीत संपूर्ण बदल आणि चैतन्य आणू शकते, पृथ्वीला सौंदर्य बहाल करते. विशेष म्हणजे कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीचा परिणाम त्याच्यावर होत नाही. ते आपले जीवन चालू ठेवते.

**गवताचे स्वभाव वैशिष्ट्य**

साने गुरुजी यांच्या स्वभावानुसार 'जगाला प्रेम अर्पावे' ही वृत्ती त्यांना गवतामध्येही दिसते. माणसाने गवताचे कितेही हाल केले, तरी ते कोणत्याही पद्धतीने आपली व्यथा व्यक्त करीत नाही. त्याने आपला सारा देह परार्थ म्हणजे दुस-याच्या हितासाठीच दिलेला असतो. एवढेच नव्हे तर इतरांसाठी परत आनंदाने जगण्याची वृत्ती त्या गवताकडे आहे. जगाच्या कल्याणासाठी पुन:पुन्हा जन्म घेतोस.

गवताकडे सर्वांना समानतेने वागविण्याची म्हणजे समदृष्टी आहे. त्यामुळे चांगल्या प्रमाणे वाईट मनोवृत्तीच्या सर्व प्राणीमात्रांना तो आपल्या मऊ अशा देहावर येऊ देतो. त्याच्याकडे 'आपपर भाव' नाही. त्यासाठी लेखकांनी दिलेली उदाहरणे वाचा.

**गवताचे मोठेपण**

गवताचे मोठेपण सांगण्यासाठी संत तुकाराम महाराज यांच्या एका गाजलेल्या उक्तीचा ते दाखला देतात. त्यातील साम्य शोधा.

संत तुकाराम महाराज विठ्ठलाकडे मागणे मागतात की, " हे विठ्ठला, (तुझ्या सहवासाचे) मला सुख देण्यासाठी तू मला पुन्ह:पुन्हा जन्म दे". त्यांना मुक्ती नको होती. तसेच गवताचेही आहे. जरा कुठे ओलावा आढळला की कशाची पर्वा न करता, ते इतरांसाठी जगण्यास सिद्ध होते. हे गवताचे गुण सर्व काळात आणि अव्याहतपणे म्हणजे अखंडपणे दिसतात. त्याला मिळालेले अमरत्वाचे म्हणजे कधीही मरण न येण्याचे वरदान, इतरांसाठी जगण्याच्या त्याच्या वृत्तीमुळे आहे.

**तरुणाची परोपकारी वृत्ती**

या गवताच्या पात्याचे नैसर्गिक वैशिष्ट्य म्हणजे त्याचा हिरवागार रंग. लेखकाने या रंगाचाही कसा खुबीने विचार केला आहे?

टोळ, पतंग नाकतोडे हे सारे कीटक गवताचे अन्न खातात. त्यांचा रंगही पाचूच्या रंगासारखा हिरवा आहे . गवतामुळेच त्यांचे संरक्षण होण्यास मदत होते. म्हणजेच गवत त्यांचा अन्नदाता आणि रक्षणकर्ताही आहे.

तृण मानवास किती उपकारक आहे? यासाठी किती दाखले लेखकांनी दिले आहेत?

गवताच्या हिरवळीवर तप करण्यास साधू बसतात. शिणलेली माणसे विश्रांती घेण्यासाठी हिरवळीवर थांबतात. चेंडू खेळण्यासाठी गवताचा वापर होतो. पृथ्वीवरील सर्व बागांमध्ये सौंदर्य निर्माण करणारा घटक तृणच असते. त्याच्याशिवाय फुले, कारंजी यांना सौंदर्य प्राप्त झालेच नसते. स्वत: अत्यंत सुंदर असणा-या

गवताला खरे सौंदर्य प्राप्त होते ते त्याच्या साधेपणामुळे आणि सरळ स्वभावामुळे. येथे तुमच्या लक्षात आले असेल की ‘सरलपणा’ या शब्दाच्या दोन अर्थांचा खुबीने वापर झाला आहे.

**तरुणाची माणसाला शिकवण**

पाठाच्या शेवटच्या दोन परिच्छेदात लेखकांच्या कोणत्या विचारांचा परिणाम आपल्यावर होतो?

गवत दिसायला छोटे पण त्याचा मोठेपणा समजून घ्यायला आपली पात्रता हवी. नव्हे आपली वृत्ती तृणाप्रमाणे साधी. सरळ आणि परोपकारी हवी. कवी व्हिटमन किंवा थोर तत्त्वज्ञ रामतीर्थ हे महान असल्याने त्यांना तुझी महती समजली. पुन्हा संत तुकारामांच्या उक्तीनुसार ‘हे समजून घायला पात्रताच हवी’ असे लेखक म्हणतात. मी तुझे मोठेपण समजून घ्यायला इतका थोर नाही.पण तुझा मोठेपणा स्मरून तुला नम्र होऊन अभिवादन करतो.असे ते म्हणतात.

**स्वाध्याय:**

**उजळणी प्रश्न**

पाठ टाचणाची व पाठ्यपुस्तकातील पाठाची मदत घ्या आणि खालील स्वाध्याय सोडवा .

अ. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ३० ते ४० शब्दांत लिहा.

१. ‘तू श्रीमंत होतोस, परंतु तुझी श्रीमंती देण्यासाठी आहे’, असे साने गुरुजी यांनी गवतास का म्हटले आहे?

२. तृणाचा कोणता गुण तुम्हांला अधिक आवडला?का?

ब. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५० ते ६० शब्दांत लिहा.

१. या पाठाच्या आधारे माणसात कोणत्या गुणांची आवश्यकता आहे असे तुम्हास वाटते?

२.तृणाचा त्याग मानवास का उपयुक्त ठरतो?

क. खालील वाक्यांचे संदर्भासहित स्पष्टीकरण लिहा.

१.या तुझ्या अमरत्वाचे साधन परोपकारितेत आहे.

२.लहान वस्तूतही ऐक्यामुळे व दृढ निश्चयाने पहा कसे सामर्थ्य उत्पन्न होते.

**मुक्त प्रश्न**

१. तुम्ही माळरानावर गेला आहात. गवत तुमच्याशी बोलू लागले, अशी कल्पना करा. तुमचा आणि गवताचा संवाद लिहा.

२. ‘तृणाचे आत्मकथन’ विषयावर १०ते१२ ओळींचा निबंध लिहा.